# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक १२ मार्च, २०२५

## (सकाळी ०९.४५ ते १०.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **श्री. अजय चौधरी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईमधील मूळ मुंबईकर मराठी माणूस घर विकून मुंबईबाहेर जाऊ नये व मुंबईत मराठी माणसांच अस्तित्व टिकाव म्हणून महाविकास आघाडीच्या काळात मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ५०० चौ. फुटापर्यंच्या निवासी इमारती व निवासी गाळे यांना मालमत्ता कर पुर्णपणे माफ करणे, त्यामुळे मुंबईतील लाखो सदनिकाधारकांना याचा फायदा झालेला असणे, मुंबईतील वाढते पुनर्विकास प्रकल्प व विकास नियंत्रण नियमावलीतील विविध सुधारित तरतुदींचा विचार करता सध्या मुंबईमध्ये जुन्या चाळींच्या समूह पुनर्विकासात देखील वि.नि.प्रो.नि.२०३४ नुसार ५५० ते ६५० चौ. फुटांचे घर उपलब्ध होत असणे, पुनर्विकासित प्रकल्पांमध्ये बहुसंख्य कुटुंब राहत असून त्यांना मालमत्ता करामध्ये सवलत न मिळणे, मुंबईतील सध्याची जीवनशैली व भौगोलिकतेच्या आधारे घरांचे वाढीव मालमत्ता कर भरण्यास सोयिस्कर होत नसल्याने घर विकून मुंबई बाहेर जात असणे, त्यामुळे मुंबईतील महानगरपालिकेचा मालमत्ता कर ७०० चौ. फुटापर्यंत माफ करणे आवश्यक असणे, मुंबईत मराठी माणसाचे अस्तित्व टिकून राहावे व मुंबईतील मूळ रहिवाश्यांना न्याय मिळावा याकरीता मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ७०० चौ. फुटापर्यंतच्या निवासी गाळ्यांना मालमत्ता कर पूर्णपणे माफ करावा अशी मागणी मुंबईतील लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे लेखी निवेदनाव्दारे केलेली असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री. राजेंद्र गावित, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात वसई विरार शहर महानगरपालिकेमध्ये घनकचरा व्यवस्थापन संबंधित २४ कोटी ६४ लाख रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास येणे, भारतीय लेखापरीक्षण आणि लेखा विभागाचे लेखापाल (ऑडिट-१) महाराष्ट्र यांच्याकडील परीक्षण अहवालात उक्त प्रकल्पाचा कोणताही उपयोग न होता २४ कोटी ६४ लाख खर्च केला गेला असल्याचे उघडकीस येणे, उक्त प्रकल्प फसल्यामुळे हरित

लवादाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ यांच्याद्वारे वसई विरार शहर महानगरपालिकेला नोटीस बजावलेली असणे, तसेच उक्त प्रकल्पाचे आयआयटी, पवई, मुंबई यांच्या माध्यमातून त्रिसदस्य संस्था परीक्षण झाले असून त्याचा अहवाल ऑडिट रिपोर्ट माहे मे, २०१७ मध्ये सादर करण्यात आलेला असणे, या तीनही अहवालाच्या नुसार शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया."

**(३) श्री. देवेंद्र कोठे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"सोलापूर शहरातील मुलभूत आणि पायाभूत सुविधा भक्कम करण्यासाठी प्रामुख्याने अमृत-२ योजनेंतर्गत पाणी पुरवठ्यासाठी दोन मोठे प्रकल्प, नगरोत्थान योजनेंतर्गत नाला ट्रनिंग, दोन उड्डाणपूल, शहरातील प्रवासी सेवेसाठी १०० इलेक्ट्रिक बस तसेच शहराचा हरितपट्टा वाढविण्याबरोबर पर्यटन केंद्राचा विकास आदी कामांचा समावेश असून या १ हजार ७८६ कोटींच्या विकास कामांचे प्रस्ताव गेल्या काही वर्षापासून शासनाकडे कोणतीही कार्यवाही न करता पडून असणे, शहरातील पाणीपुरवठा सुधारण्यासाठी ८३५ कोटींचा विकास आराखडा तयार करुन तांत्रिक मान्यतेसाठी गेल्या दोन वर्षापासून म.जि.प्रा.पुणे यांचेकडे प्रलंबित असणे, शहरात दोन उड्डाणपूल २०१५ पासून प्रस्तावित असून अद्यापही सदर पूलांचे काम निधीअभावी सुरु न होणे, तसेच नाला ट्रनिंगकरीता ९८ कोटींचा दुरुस्ती प्रस्ताव गेल्या ६ महिन्यांपासून शासनाकडे प्रलंबित असणे, तसेच इलेक्ट्रिक बस, शहराचा हरितपट्टा वाढविणे, पर्यटन केंद्राचा विकास आदी कामांचे प्रस्तावांवर शासनाकडून कोणतीही कार्यवाही न करता पडून असल्याने सोलापूर शहरातील विविध प्रकल्प निधी अभावी ठप्प झालेले असणे, परिणामी सोलापूर शहरासह जिल्ह्यातील नागरीकांमध्ये शासनाप्रती वाढता तीव्र असंतोष, शासनाने सोलापूर शहराचा सर्वांगिण विकास होण्यासाठी तसेच उक्त योजनेंतर्गत ठप्प पडलेली विकास कामे लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी प्रलंबित प्रस्तावांना तातडीने मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

**(४) श्री. विलास भुमरे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पाणी पुरवठा योजना शहराच्या विकासासाठी अतिशय महत्वाची असणे, सदर योजना प्रथम नगरोत्थान व तद्नंतर अमृत टप्पा-२ अंतर्गत मंजूर असणे, मागील तीन महिन्यांच्या कालावधीत योजनेची प्रगती अतिशय संथ गतीने होत असणे, योजनेची प्रगती ६० टक्क्यांपेक्षा जास्त असताना म्हणजेच अंतिम टप्प्यात असताना जलशुद्धीकरण केंद्र, मुख्यजलवाहिनी व पंप गृहया प्रमुख उपांगात बदल करुन योजना आणखी कित्येक महिने पुढे ढकलली जाणे, तथापि मुख्य

अभियंता व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागीय आयुक्तांकडून माहे जुलै, २०२५ पर्यंत सदर योजनेचे काही अंशी काम पूर्ण होऊन पाणी येईल अशी आश्वासने देण्यात येणे, योजनेचे काम गुणवत्तापूर्वक होण्यासाठी अभियंत्याची गरज असताना देखील ठेकेदाराच्या सोयीसाठी तांत्रिक सेवा सल्लागार काढून टाकण्याचे आदेश देण्यात येणे, तसेच मुख्य जलवाहिनीवर हायड्रॉलिक चाचणी करणे गरजेचे असतानाही तांत्रिक सल्लागार व विभागाचे अभियंता यांच्यावर दबाव आणून ठेकेदारांच्या सोईसाठी हायड्रॉलिक चाचणी करण्यात आलेली नसणे, परिणामी चाचणी न केल्याने सदर पाईप लाईन भविष्यात धोकादायक ठरणे, जर जलवाहिनी फुटली तर परिसरातील गावे जलमय होण्याची शक्यता असणे, यावर वारंवार पाठपुरावा करुनही कोणतीही कार्यवाही न होणे, याबाबत नागरिकांच्या मनात शासनाप्रती चीड व असंतोष निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) श्री.अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, ॲड पराग अळवणी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई उपनगरातील अंधेरी पश्चिम येथील डी. एन. नगर येथे एअरपोर्ट अथॉरिटीच्या जमिनीवर असलेल्या ट्रान्समिशन टॉवर्सच्या आजूबाजूच्या परिसरामध्ये पुनर्विकासासाठी हाईट रिस्ट्रीक्शन व निर्बंध असणे, यामुळे डी.एन. नगर व गुलमोहोर या परिसरातील विकास खोळंबलेला असणे, अनेक मध्यमवर्गीय कुटुंबे गेल्या ४० ते ५० वर्षांपासून राहत असलेल्या इमारती जीर्ण झाल्या असणे, सदर निर्बंधामुळे पुनर्विकासाचा खोळंबा झालेला असणे, सदर निर्बंधामुळे येणाऱ्या नजीकच्या काळामध्ये मध्यमवर्गीय कुटुंबे राहत असलेल्या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत असे घोषीत करण्यात आले तर त्यांच्या राहण्याची गैरसोय होण्याची शक्यता असणे, सदर जमिनीवर असलेले ट्रान्समिशन टॉवर इतरत्र हलऊन डी.एन. नगर व गुलमोहोर परिसरामध्ये असलेला हाईट रिस्ट्रीक्शन व निर्बंध हटवण्याची आवश्यकता असणे, सदर इमारतींचा पुर्नविकास होत नसल्यामुळे शासनाचाही महसूल बुडत असणे, डी.एन. नगर व गुलमोहोर परिसराच्या आजूबाजूच्या परिसरामध्ये असलेला हाईट रिस्ट्रीक्शन व निर्बंध हटवण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(६) ॲड. राहुल ढिकले, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"सन १९९५ पासून नाशिक महानगरपालिकेकडे जमीन भूसंपादनाची एकूण २७१ प्रकरणे प्रलंबित असणे, प्रलंबित २७१ प्रकरणांचे व्याज सुरु असणे, तत्कालीन मनपा आयुक्त व भूसंपादन अधिकारी यांनी मा.उच्च न्यायालयाचा अवमान तसेच शासनाचे नियम डावलून ११ विशिष्ठ प्रकरणांमध्ये ५५ कोटींचे बेकायदेशीर भूसंपादन करणे, प्राधान्यक्रम डावलून जुनी २७१ प्रकरणे प्रलंबित असताना विशिष्ठ ११ प्रकरणांना

रुपये ५५ कोटींची नुकसान भरपाई देणे, नाशिक महानगरपालिकेला रस्ते, पायाभूत सुविधा व अन्य कारणांसाठी ज्या शेतकरी बांधवांनी जमिनी दिल्या त्यांना मोबदला दिला नसणे, सदरील शेतकरी बांधवांनी सन २०२७ च्या सिंहस्थ कुंभमेळाच्या कामावर बहिष्कार टाकण्याचा इशारा देणे, सदरील प्रकरणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १६/१२/२०२४ रोजी मा.मुख्यमंत्री महोदय यांना लेखी निवेदनाद्वारे बेकायदेशीर भूसंपादन प्रकरणाची उच्चस्तरीय समिती मार्फत चौकशी करून तत्कालीन मनपा आयुक्त व संबधित विकासकांवर कारवाई करण्याबाबत मागणी केलेली असणे, मुख्यमंत्री महोदयांनी तातडीने वस्तुनिष्ठ अहवाल शासनास सादर करण्याचे आदेश दिले असणे, बेकायदेशीर भूसंपादन प्रकरणात आर्थिक हितसंबध असलेले अधिकारीच अहवाल बनवत असणे, त्रयस्थ चौकशी समिती होणे अपेक्षित असणे, सदरील प्रकरणी मा.उच्च न्यायालयाचा अवमान व शासनाचे नियम तोडून बेकायदेशीर भूसंपादन करणारे दोषी अधिकारी व आर्थिक लाभ घेणारे विशिष्ट विकासकांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

**(७) सर्वश्री. भीमराव तापकीर, बापूसाहेब पठारे, डॉ. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे मनपा हद्दीत नव्याने समाविष्ट ३२ गावांमध्ये नागरी सुविधा अत्यंत अपुऱ्या असणे, ज्यामध्ये दूषित व अपुरा पाणीपुरवठा, मलनि:स्सारण व्यवस्था, अनियमित वीजपुरवठा, खराब रस्ते व दुरुस्ती अभावी नागरिकांना होणारा त्रास, घनकचरा व्यवस्थापनासाठी अपुरी यंत्रणा इत्यादी करिता राज्य शासनाने स्वतंत्र विकास निधी मंजूर करण्याची आवश्यकता असणे, प्रमुख रस्ते, जोडरस्ते आणि पदपथांवर अतिक्रमण झाले असणे, २३ गावांचे शहर सर्वेक्षण (सिटी सर्व्हे) अद्याप पूर्ण न झाल्याने भूखंडांच्या कायदेशीर प्रक्रिया रखडल्या असणे, विकास आराखड्यातील डीपी रस्ते आणि इतर आरक्षणे अद्याप विकसित न झाल्याने त्यावर अतिक्रमण होत असणे, आरक्षित भूखंड ताब्यात घेण्याची प्रक्रिया गतीमान करण्यासाठी क्रेडिट बाँड पॉलिसी त्वरित लागू करण्याची आवश्यकता, यापूर्वी मनपाने विधिमंडळात लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून लक्ष वेधलेल्या प्रश्नांवर कार्यवाही केली नसणे, समाविष्ट ३२ गावांतील नागरिकांवर मागील वर्षांचे मिळकत कर थकबाकी आणि अन्यायकारक दंड लादला जात असणे, अन्यायकारक दंड माफ करणे, वारजे कर्वेनगर (तपोधाम परिसर) सर्वे नं. २,३,८,९,१२,१३ या १६ एकर जागेवर एल.आर.टी. टर्मिनससाठी आरक्षण असणे, गेल्या ३० वर्षांपासून येथे लोकवस्ती असून बांधकाम परवानगी व वाढीव बांधकामास परवानगी मिळत नसणे, वडगाव बुद्रुक सर्वे क्र. ४३, ४७, ४८ आणि ४९ क्षेत्रासाठी BDP आरक्षण हटवण्याचा प्रस्ताव प्रलंबित असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(८) श्री. तुकाराम काते, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधतील :-**

"चेंबूर लाल डोंगर एसआरए गृहनिर्माण सोसायटीचे, एसआरए च्या इमारतीचे बांधकाम एसआरए च्या मान्यतेने विकासक श्री. कुपर यांनी अतिशय निकृष्ट दर्जाचे केलेले असणे, इमारतीमधील रहिवाशांना व्हेंटिलेशन नसल्याने आजार होणे, एसआरएच्या इमारतीला सीवरेज लाईन नसणे, पाण्याची लाईन नसल्याने रहिवाशांची होत असलेली गैरसोय दूर करण्याची जबाबदारी विकासकाची असतानाही विकासकाकडून होत असलेले दुर्लक्ष, इमारतीच्या आत मुलांना खेळण्यासाठी मैदान, ज्येष्ठ नागरिकांसाठी लहान मुलांसाठी गार्डनची आवश्यकता असतानाही विकासकाने इमारतीच्या मोकळ्या जागेत मंदिर, बौद्ध विहार व मस्जिद यांचे दुसऱ्या जागेत पुनर्बांधकाम करून न दिल्याने मोकळी जागा न झाल्याने मैदान व गार्डन विकासकाने विकसित न करणे, एसआरए इमारतीच्या बाजूला अल्टा विस्टा सेल बिल्डिंगचे बांधकाम करून तेथील रहिवाशांना पाणी, सीवरेजची सुविधा देण्यास विकासकाने दुर्लक्ष करणे, शेजारील झोपडपट्टीचे कचरा व्यवस्थापन मुंबई महानगरपालिकेकडून नीट होत नसल्याने कचऱ्याची दुर्गंधी इमारतीच्या आवारात येणे, अल्टा विस्टा इमारतीच्या आवारात शेजारी झोपडपट्टीतील शौचालयांना सीवरेज लाईन नसल्याने शौचालयाचे मलमूत्र घाण पसरणे, यास विकासक श्री. कुपर जबाबदार असून याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(९) श्री. हेमंत रासने, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे शहरातील कसबा पेठ मधील सर्व्हे नंबर १२६५, १२७०, १२७३, १२७४, १२७७ व १२७८ या भूखंडावरील रहिवाशी गेल्या ९० वर्षाहून अधिक काळापासून तेथे वास्तव्यास असून दिनांक २४/८/१९८९ रोजी शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी पुनर्वसन कायदा १९७१ नुसार सदर जागेसाठी गलिच्छ वस्ती आदेश राजपत्र काढण्यात येणे, सन २०११ पासून एसआरए प्रकल्पाकरिता प्रयत्न करुन कायदेशीर प्राथमिक यादी व सर्वेक्षण पूर्ण होणे, दिनांक २५/४/२०१३ रोजी चंद्रशेखर रियल इस्टेट प्रा.लि., पुणे या विकासकांनी सदरचा प्रस्ताव दाखल करणे, परंतु सदर एसआरए प्रकल्पास कायद्याच्या नियम १४ नुसार संबंधित जमीन भूसंपादनाची प्रक्रिया अद्यापही सुरु न करणे, तसेच रहिवाश्यांचे ५० महिन्यांचे घरभाडेही विकासकाकडून थकीत असणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित मंत्री महोदयांकडे पत्रव्यवहार करुनही अद्यापही या संदर्भात कोणतीच कार्यवाही न होणे, परिणामी या रहिवाश्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(१०) कॅप्टन आर. सेल्वन, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधतील :-**

"मागील १०-१५ वर्षांपासून सायन कोळीवाडा मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात अनेक एस.आर.ए प्रकल्प अपूर्ण असणे, विकासकाला LOI प्राप्त झाल्यानंतर १२-१५ वर्ष बांधकाम देखील सुरु न करणे, या कालावधीत नागरिकांचे भाडे थकीत असणे, सदर भाडे मिळण्याकरिता एस.आर.ए प्राधिकरण कार्यालयात फॉर्म भरून थकीत भाडे मिळण्याकरिता व्यवस्था उपलब्ध असून देखील विकासक धार्जिण्या अधिकाऱ्यांकडून नागरिकांची दिशाभूल होत असणे, अधिकारी आपल्या मर्जीतील विकासकाची जबरदस्तीने नेमणूक करीत असणे, विकासक स्थानिक रहिवाशी यांना न जुमानता चुकीच्या पद्धतीने काम करत असल्याचे निदर्शनास आले असता एस.आर.ए प्राधिकरणामध्ये तक्रार केल्यास सदर विकासकावर १३/२ ची कारवाई केली जात असणे, सद्य:स्थितीत एस.आर.ए नियमांचा गैरफायदा घेत विकासक कोर्टकचेरी व इतर पद्धतीने २ ते ३ वर्ष वाया घालवत असणे, अशा परिस्थितीमध्ये विकासक बदलीचे पूर्ण अधिकार नागरिकांकडे असणे आवश्यक असणे, परिशिष्ट-२ मध्ये नाव समाविष्ट असून देखील बांधकाम सुरु न केल्यास बांधकाम सुरू होण्याच्या तारखेपर्यंत खरेदी-विक्रीचे अधिकार मिळण्याबाबत एस.आर.ए नियमात नवीन सकारात्मक बदल करणे गरजेचे असणे, नाव नमूद असलेल्या झोपडपट्टीधारकाला पात्र घोषित करणे क्रमप्राप्त असावे, एखादा प्रकल्प विकसित करण्याकरिता हाती घेतेवेळी संरचना प्लॅनच्या अनुषंगाने इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे किंवा नाही याची माहिती प्राधिकरणातर्फे स्थानिक रहिवाश्यांना देणे बंधनकारक असावे, परिणामी विभागातील रहिवाश्यांमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष, रखडलेले पुनर्वसन प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करून झोपडीधारकांना हक्काची घरे मिळवून देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(११) श्री. संजय मेश्राम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"उमरेड ३५३-डी नागपूर-उमरेड या चार पदरी राष्ट्रीय महामार्गालगत जवळच्या अंतरावर उमरेड आमनदी पात्राच्या किनाऱ्याजवळ ‘कोल यार्ड’ चे काम युद्धपातळीवर सुरू असणे, तसेच गांगापूर, कावरापेठ आणि बुधवारीपेठ या दाट लोकवस्तीला खेटूनच या ‘कोल यार्ड’चे कार्य पूर्णत्वास येत असणे, कोल यार्डमुळे शेकडो एकर शेती, शेतकरी आणि लोकवस्तीवर ‘काला पत्थर’ ची धूळफेक होणार असून, प्रदूषणाने उमरेड परिसर काळवंडणार असल्याचे दिसून येत असणे, सदर कोल यार्डचा परिसर सुमारे १ किलोमीटरपर्यंतचा असून, या ठिकाणी कोळसा खाणीमधील शेकडो ट्रक कोळसा एकत्रित केला जाण्याची शक्यता, येथून रेल्वेच्या माध्यमातून पॉवर प्लांट, एनटीपीसी, थर्मल पॉवर स्टेशन तसेच खासगी स्तरावर मोठ्या प्रमाणात कोळसा वाहतूक होण्याची शक्यता, तसेच गांगापूर परिसरात होणारा ‘कोळसा डेपो’ रेल्वे

रुळाच्या दुतर्फा असलेल्या शेकडो एकर शेतजमिनीचे नुकसान करणार असणे, त्यामुळे आमनदीचे पात्र, लोकवस्ती, शेती आणि निसर्गावर या कोळशाच्या प्रदूषणाचा जबरदस्त फटका बसणार असून, गोरगरीब शेतकरी यांच्यावर अन्यायकारक असणे, त्यामुळे शेती, शेतकरी, लोकवस्ती यावर प्रदूषणाचे संकट दिसून येत असणे, आमनदी असल्याने निसर्गाचा समतोलही बिघडण्याची शक्यता, त्यामुळे कोळसा डेपोच्या प्रदूषणाचा त्रास होणार असल्यामुळे या कोळसा डेपोची जागा दुसरीकडे वळवावी अशी मागणी स्थानिक नागरिकांच्या वतीने करण्यात आली असणे, परिणामी याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१२) सर्वश्री. चंद्रकांत नवघरे, सुनिल प्रभू, अनिल पाटील, शेखर निकम, अजय चौधरी, वरुण सरदेसाई, बाबासाहेब देशमुख, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"प्लॉस्टर ऑफ पॅरिस (पीओपी) पर्यावरणाला घातक असल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार शासनाद्वारे पीओपी मूर्ती बनविण्यास घालण्यात आलेली बंदी, या निकालानंतर दिनांक १ जानेवारी, २०२५ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेने पीओपीच्या मूर्ती खाडी किंवा समुद्रात विसर्जित करु नये असा काढलेला आदेश, मात्र विसर्जनासाठी कृत्रिम तलाव तयार नसल्याने गणेश मूर्ती कुठे विसर्जित करावयाची असा प्रश्न निर्माण होणे, या बंदीवरुन मूर्तिकार आक्रमक होऊन ही बंदी उठवण्याबाबत शासनाकडे करीत असलेली विनंती, प्रत्यक्षात हा निर्णय घेताना मूर्तिकारांची मते, सूचना विचारात न घेतल्यामुळे तसेच मूर्तीमुळे हा विषय विघटनाचा होतो तर पर्यावरणाचा होत नाही ही बाब कोणीच लक्षात न घेणे, पीओपी मूर्ती का नको याचा वैज्ञानिकदृष्ट्या अभ्यास होण्याची गरज, पीओपी मूर्तीवर बंदी मागील कारण पर्यावरण असेल तर पीओपी सारखेच अन्य पर्याय सूचविण्याबाबत मूर्तिकारांनी केलेली मागणी, शाडू मातीची मूर्ती घडविणे खूप कठीण असून त्या मूर्तीचे वजन व किंमतही अधिक असते हे लक्षात घेता पीओपी मूर्ती बनविण्यावर घातलेल्या बंदीमुळे राज्यातील सर्व मूर्तिकार यांच्यावर अवलंबून असलेले त्यांचे संपूर्ण कुटुंब, कामगार वर्ग यांच्यावर आलेली उपासमारीची वेळ, गणेश उत्सव व नवरात्र उत्सवात राज्यात सुमारे ९५ टक्के पीओपी मूर्ती बनविल्या जातात हे बंद केल्यामुळे अनेक कामगार बेरोजगार होऊन त्यांचेवर ओढवलेले आर्थिक संकट, परिणामी जनतेत पसरलेला असंतोष लक्षात घेता शासनाने तात्काळ फेरविचार करण्याकरिता करावयाची आवश्यक कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## ( सकाळी ११.०० वाजता )

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ)** : गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा स्वतंत्र लेखा परीक्षण अहवाल व सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** :

**(क)** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे सन २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचे सन २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचे सन २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे सन २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचे सन २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(च)** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर यांचे सन २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(छ)** मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(ज)** श्रीमती नाथाबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०१९-२०२० व २०२०-२०२१ यावर्षांचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(झ)** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(ञ)** महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०२१-२०२२ ते सन २०२३-२०२४ या वर्षांचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(ट)** महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, नागपूर यांचे सन २०१६-२०१७ ते सन २०२२-२०२३ या वर्षांचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(ठ)** महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचे सन २०२३-२०२४ या वर्षांचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(ड)** महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचा सन २०२२-२०२३ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(३) उद्योग मंत्री** : **(क)** पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०२२ -२०२३ या वर्षाचा बावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** कोकण विकास महामंडळ, मर्यादित, मुंबई यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा त्रेपन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : महसूल मंत्री तथा संयुक्त समितीचे समिती प्रमुख यांचा प्रस्ताव :**

"सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ – महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक, २०२४ यावरील २१ सदस्यांची संयुक्त समिती दोन्ही सभागृहाच्या संमतीने दिनांक २१ डिसेंबर, २०२४ रोजी घटित करण्यात आली आहे. सदर समितीच्या प्रारंभिक बैठकीत समितीच्या रचनेत आणखी ४ सदस्यांची वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार समितीच्या रचनेत आणखी ४ सदस्यांची वाढ करण्यात येऊन समिती २५ सदस्यांची करण्यात यावी. "

**चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(१) श्री. अनुपभैय्या अग्रवाल, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"धुळे येथील देवपूर उपनगरातील वीट भट्टी परिसरात सिटी सर्व्हे क्रमांक ११३ सी.टी.एस. क्रमांक ४७९५ वर शासनाच्या मालकीची सुमारे ६ हे. १४ आर जमिनीवर जिल्हा कारागृहाच्या जागेचे शासनाकडून आरक्षण प्रायोजित निश्चित करण्यात येणे. तसेच जागेवर पोलिस प्रशिक्षण वर्ग व खुले महिला कारागृह बांधकाम करण्याचे प्रायोजित करण्यात येणे, जागेवर पोलिस स्टेशन व कर्मचारी निवासस्थान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असणे. ह्या जागेवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याचे निदर्शनात येणे. सदर अतिक्रमण काढण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी शासनाकडे मागणी केलेली असणे. तरीही शासनाकडून सदर मागणी दुर्लक्षित करण्यात येणे. यामुळे स्थानिक जनतेत शासनाप्रती असंतोष निर्माण होणे. अतिक्रमण तातडीने काढण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री. विनोद निकोले, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मौजे. चिंचारे, ता.जि.पालघर येथील आदिवासी शेतकरी श्री.विठ्ठल कुंभारे यांची भूमापन क्र.३० वरील ०८ हेक्टर १८ आर जमीन आदिवासी संरक्षित कुळ म्हणून त्यांच्या नावे असणे. सदर जमिनीचे मूळ मालक म्हणून रेकॉर्ड वर हरीश दामोदर कसांरा व इतर अशी नावे असणे. सदर व्यक्तींनी कुलमुखत्यार पत्र घेऊन सदर जमिनीच्या सातबारावर श्री. कुंभारे यांच्या नावाचे नोंद कमी करण्यासाठी मुंबई कुळ कायदा कलम ७० प्रमाणे पालघर येथील शेत जमीन न्यायाधिकरण यांच्या न्यायालयात टेनेन्सी अर्ज क्रमांक १८ /२०१० करणे, सदर अर्जामध्ये तहसीलदार पालघर यांनी कागदपत्रे तपासून जमिनीच्या सातबारावर पूर्वजांच्या नावाची नोंद दिनांक ०१/०४/१९५७ रोजी कृषक दिवसापासून असल्या कारणाने कुळांची नावे कमी करता येणार नसल्याचे जमीन मालक यांचा कुळ कमी करण्याबाबत दिनांक २३/०९/२०१० चा अर्ज निकाली काढणे, अमित भालचंद्र चुरी यांनी सदर जमिनीच्या मिळकतीच्या सरकारी कागदपत्रात चुकीच्या पद्धतीने फेरफार करून खोटे दस्त करून संबंधित शेतकऱ्यांना गावगुंडांकडून जमिनीचा ताबा घेण्याकरिता धमकावण्याचा प्रकार होणे. तहसीलदार पालघर यांच्या निर्णयानुसार संरक्षित कुळाची नावे कमी करता येत नसतानाही चुकीच्या पद्धतीने कमी करण्यास संबंधित तलाठी, मंडळ अधिकारी, तहसीलदार व आदिवासी शेतकरी कुटुंबावर दबाव आणून जमीन बळकावण्याचा प्रयत्न करणाऱ्या संबंधित व्यक्तीवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाकडून करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) डॉ. राहूल आहेर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधतील :**

"नाशिक जिल्ह्यात उन्हाची तीव्रता वाढल्याने पाण्याची मागणी दिवसेंदिवस वाढत चालली असणे, चांदवड तालुका हा अवर्षणप्रवण तालुका म्हणून ओळखला जाणे, यामुळे जानेवारी महिन्यापासून तालुक्यात पाणीटंचाईच्या झळा जाणवायला सुरुवात होणे, विहिरी, कूपनलिका कोरडे पडायला सुरुवात होणे, पर्यायाने पिण्याच्या पाण्याची चिंता नागरिकांना भेडसावणे, अशा परिस्थितीतही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ४४ गाव पाणीपुरवठा योजनेद्वारा चांदवड तालुक्यातील गावांना सतत विस्कळीत पाणीपुरवठा केला जात असल्याचे वारंवार निदर्शनास येणे, पर्यायाने तालुक्यातील नागरिकांच्या वारंवार तक्रारी प्राप्त होत असून, संबंधित अधिकाऱ्यांनी ज्या ठिकाणी पाईपलाइन खराब असेल त्या ठिकाणी तत्काळ दुरुस्ती करून ४४ गाव पाणीपुरवठा योजनेद्वारे सर्व गावांना नियमित पाणीपुरवठा करा अशा सूचना व मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी करणे, परंतु तरीही चांदवड येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ४४ गाव पाणीपुरवठा योजनेच्या पाण्याची एकूण उचल व एकूण वाटपामध्ये मोठी तफावत असल्यामुळे सतत विस्कळीत पाणीपुरवठा होत असणे, त्यामुळे उन्हाळयात ४४ गाव पाणीपुरवठा योजनेद्वारा सुरळीत पाणीपुरवठा व्हावा यासाठी शासनाने तात्काळ उपाययोजना करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(४) श्री. रमेश बोरनारे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पणन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"वैजापूर (जि. छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या व्यापारी संकुलात शेतकऱ्यांनी आपला शेतमाल कांदा विक्रीस आणणे, या शेतमालाची बाजार समितीच्या नियमाप्रमाणे लिलाव पद्धतीने विक्री होणे. लिलावामध्ये बाजार समितीच्या अधिकृत व नोंदणी झालेल्या व्यापाऱ्याने बोली बोलून शेतमाल खरेदी करणे, शेतमाल खरेदी केल्यानंतर शेतकऱ्यांस शेतमाल खरेदी केलेल्या व्यापाऱ्याने काही रक्कम अग्रीम स्वरुपात रोख देणे, बाकी उर्वरित रक्कम देण्यास व्यापाऱ्याने टाळाटाळ करणे, त्यामुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होऊन जवळजवळ २ कोटी ७ लक्ष रुपयाला शेतकऱ्यांना मुकावे लागणे, यासंबंधी बाजार समितीने संबंधित व्यापाऱ्यावर आर्थिक गुन्हा नोंदवणे, व्यापाऱ्याने शेतकऱ्यांचे पैसे देण्यास असमर्थता दर्शवणे, शेतकऱ्यांच्या कष्टाच्या पैशाची लुबाडणूक होऊ नये म्हणून ता. वैजापूर बाजार समितीने संचालक, पणन, पुणे यांच्याकडे शेतकऱ्यांचे पैसे देता येतील का याबाबत मार्गदर्शन मागवणे, संचालक, पणन, पुणे यांनी केलेल्या मार्गदर्शनात बाजार समितीस शेतकऱ्यांना पैसे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शेषमधून देण्याबाबत मार्गदर्शन करणे, परंतु संचालक, पणन, पुणे, यांच्या मार्गदर्शनपत्रामध्ये व जिल्हा निबंधक यांनी बाजार समितीस दिलेल्या पत्रामध्ये तफावत असणे, यामुळे शेतकरी आपला कांदा शेतमाल

विकूनही शासकीय अनागोंदीमुळे आपल्या पैशापासून वंचित रहाणे, त्यावर शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व कार्यवाही, यावर शासनाची प्रतिक्रिया."

**(५) श्री. नितीन पवार, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"आदिवासी विकास विभाग, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कळवण अंतर्गत येणारी आंबुपाडा (बे) ता. सुरगाणा येथील शासकीय आश्रमशाळेत मुख्याध्यापकाकडून महिला कर्मचा-याचा विनयभंग झाल्याची घटना दिनांक ३/३/२०२५ रोजी उघडकीस येणे, सदर आश्रमशाळेतील मुख्याध्यापक हा आश्रमशाळेतील महिला कर्मचारी यांच्यासोबत रात्री अवेळी असभ्य व लज्जास्पद भाषेत बोलून शरीर सुखाची या महिला कर्मचा-यांकडून मागणी करणे, सदर मुख्याध्यापक याच्याबाबतीत वारंवार प्रकल्प कार्यालयाकडे तक्रार होऊन देखील प्रकल्प कार्यालयाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, महिला कर्मचा-यांचा सदर शिक्षकाकडून होत असलेला मानसिक छळ व विनयभंग, सदर घटनेची पत्रकार माहिती घेण्यासाठी गेले असता पत्रकारांना पोलिसांकडून होत असलेली अडवणूक, त्यामुळे सदर घटना दडपण्याचा होत असलेला प्रकार, महिलांच्या सुरक्षिततेकडे होत असलेले दुर्लक्ष त्यामुळे वाढत चाललेले असंतोषाचे वातावरण व असुरक्षिततेची भावना, याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(६) सर्वश्री. विक्रम पाचपुते, सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-**

"अँनालॉग चीज (Analogue cheese ) हा पदार्थ महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी अँनालॉग पनीर, आर्टीफिशिअल पनीर किंवा फेक पनीर या नावाने विक्री केली जाणे अँनालॉग चीज बनवण्यासाठी दुधाची गरज नसणे, अँनालॉग चीज बनवण्यासाठी प्रमुख घटक vegitable fat / वनस्पती तूप (palm oil) वापरले जाणे, आर्टीफिशिअल पनीर किंवा फेक पनीर हा शब्द प्रयोग करणेस महाराष्ट्र शासनाची परवानगी असणे, पनीर विक्रेत्यांकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार पनीरच्या दररोज विक्री होणाऱ्या एकूण विक्री पैकी अंदाजे ७०% ते ७५% प्रमाण अँनालॉग चीजचे असणे, अवघे २५ % ते ३० % हे निवळ शुद्ध दुधापासून बनवलेले असणे, अँनालॉग चीजची महाराष्ट्रामध्ये होणाऱ्या विक्री / खपामुळे दुग्ध व्यावसायावर होणाऱ्या परिणामांची / आर्थिक नुकसानीची माहिती शासनाकडे असणे, अँनालॉग चीज या चीजच्या गैरवापरामुळे ग्राहकांची दिशाभूल होणे, अँनालॉग चीजचा पनीर म्हणून वापर केला जात असणे, ही बाब शासनास ज्ञात असणे, यावर प्रतिबंध घालणे आणि ग्राहक जनजागृती करणेबाबत शासन विचाराधीन असणे, दूध व्यवसाय वाचविणेसाठी शासनाची

उपाययोजना तसेच चुकीच्या शब्दप्रयोग करून ग्राहकांची दिशाभूल थांबविणेबाबत कायदे करणेसाठी शासन विचाराधीन असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही."

**(७) श्री. गोपिचंद पडळकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने नोकर भरतीत, फर्निचर खरेदीत, संगणक खरेदीत अशा अनेक प्रकरणांमध्ये गैरव्यवहार केला असून सदरहू गैरव्यवहारांची विभागीय चौकशी सुरु असणे, जिल्हा बँकेच्या गैरकारभाराप्रकरणी सहकार आयुक्तांनी सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर चौकशीचे ताशेरे ओढले असणे, सदरहू बँकेवर विभागीय चौकशी सुरु असतांनाही बँकेने मानगंगा सहकारी साखर कारखान्याची लिलाव प्रक्रिया बेकायदेशीरपणे चालू केली असणे, सदर बँकेचे एकूण कर्ज ११८ कोटी रुपये असणे, या कर्जासाठी साखर कारखाना लिलाव पद्धतीने देण्यासाठी बँकेने लिलाव प्रोसिजर केली असणे, मानगंगा सहकारी साखर कारखान्याची २२९ एकर जमीन हडप करण्यासाठी काही राजकीय नेतेमंडळी प्रयत्न करत असल्याचे निदर्शनास येणे, विशेष कार्यकारी अधिकारी व सहनिबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र शासन यांनी सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांना दि.३०/१२/२०२२ रोजी पत्र देऊन सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची चौकशी स्थगिती उठवलेली असणे, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक मंडळ व नेतेमंडळी यांनी संगनमत करुन साखर कारखान्याची मालमत्ता बाबासाहेब देशमुख इंडस्ट्रीज प्रा.लिमिटेडच्या घशात घालण्यासाठी बेकायदेशीररित्या लिलाव प्रक्रिया सुरु केली असणे, त्यामुळे सदरहू लिलाव प्रक्रिया रद्द करुन साखर कारखाना सभासदांचा राहावा, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये केली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**सहा : सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस).**

**सात : (मंगळवार, दिनांक ११ मार्च, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री रणधीर सावरकर, अर्जुन खोतकर, अब्दुल सत्तार, सुरेश भोळे, सुधीर मुनगंटीवार, चेतन तुपे, सुरेश धस, दिपक केसरकर, अनिल पाटील, प्रशांत बंब, डॉ.तानाजी सावंत, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री नारायण कुचे, रमेश बोरनारे, राजकुमार बडोले, देवराव भोंगळे, राजेश क्षिरसागर, प्रताप पाटील-चिखलीकर, अभिमन्यू पवार, विजय शिवतारे, धर्मराव आत्राम, प्रकाश भारसाकळे, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री चंद्रकांत नवघरे, चैनसुख संचेती, मंगेश कुडाळकर, दिलीप बनकर, श्रीमती श्वेता महाले, श्री. प्रकाश सुर्वे, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री प्रवीण दटके, किशोर पाटील, नरेंद्र भोंडेकर, मोहन मते,**

**दौलत दरोडा, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री राजू तोडसाम, प्रकाश सोळंके, संजय गायकवाड, राजेश वानखडे, संतोष बांगर, संजय बनसोडे, किसन वानखेडे, दिलीप लांडे, सत्यजित देशमुख, विनोद अग्रवाल, चंद्रकांत सोनवणे, दिलीप वळसे-पाटील, संभाजी निलंगेकर-पाटील, संतोष दानवे, राजेश पवार, शिवाजी कर्डिले, सचिन कल्याण-शेट्टी, श्रीमती नमिता मुंदडा, सर्वश्री रमेश कराड, रत्नाकर गुट्टे, डॉ.संजय कुटे, सर्वश्री प्रताप अडसड, राणाजगजितसिंह पाटील, बबनराव लोणीकर, तान्हाजी मुटकुळे, किसन कथोरे, सर्वश्रीमती मोनिका राजळे, सीमाताई हिरे, देवयानी फरांदे, सर्वश्री रविंद्र चव्हाण, संजय केळकर, हरिश पिंपळे, उमेश यावलकर, सुमित वानखेडे, श्रीमती श्रीजया चव्हाण, सर्वश्री प्रशांत ठाकूर, महेश बालदी, सर्वश्रीमती सई डहाके, स्नेहा दुबे, सुलभा गायकवाड, सर्वश्री योगेश सागर, भिमराव तापकीर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री अतुल भातखळकर, शंकर जगताप, कृष्णा खोपडे, विक्रम पाचपुते, करण देवतळे, गोपीचंद पडळकर, अमल महाडिक, राहुल आवाडे, महेश लांडगे, चरणसिंग ठाकूर, अमोल जावळे, दिलीप बोरसे, डॉ. राहुल आहेर, ॲड. राहुल ढिकले, श्री. सुभाष देशमुख, डॉ. सुरेश खाडे, डॉ. अतुल भोसले, ॲड. राहुल कुल, सर्वश्री काशिराम पावरा, समीर मेघे, समीर कुणावार, विजय रहांगडाले, किर्तीकुमार भांगडिया, डॉ.आशिष देशमुख, सर्वश्री विनोद अग्रवाल, संजय पुराम, किशोर जोरगेवार, राजेश बकाने, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री श्याम खोडे, केवलराम काळे, भीमराव केराम, जितेश अंतापुरकर, सिध्दार्थ शिरोळे, अनुपभैय्या अग्रवाल, राजेश पाडवी, श्रीमती अनुराधा चव्हाण, सर्वश्री शिवाजी पाटील, संजय उपाध्याय, चंद्रकांत पाटील, सुनिल शेळके, निलेश राणे, राजेंद्र यड्रावकर-पाटील, डॉ.किरण लहामटे, सर्वश्री शरद सोनवणे, किरण सामंत, आशुतोष काळे, हिरामण खोसकर, राजेश विटेकर, राजू कारेमोरे, शेखर निकम, सचिन पाटील, संग्राम जगताप, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"शेतकरी सुखी, तर राज्य सुखी" हा मंत्र व शेतकऱ्यांच्या हिताचा विचार केंद्रस्थानी ठेऊन राज्यातील बळीराजाला स्थैर्य देणे, त्याला बळकट करणे आणि शेतीला नैसर्गिक आपत्तीपासून वाचविण्यासाठी शाश्वत उपाययोजना करणे हे ध्येय समोर ठेऊन आणि नारी शक्ती व युवा शक्तीला प्राधान्य देऊन राज्यात विविध योजना गतीमानतेने कार्यान्वित करण्याचा, जन कल्याणाचा वसा घेतलेल्या या शासनाचा प्रयत्न असणे, "नमो शेतकरी महासन्मान निधी" योजनेत राज्यातर्फे प्रती शेतकरी ६ हजार रुपये देण्यात येत असणे, केवळ १ रुपयात पिक विमा देण्यात येत असून त्यायोगे महाकृषी विकास अभियान राबविण्यात येत असणे, नुकसानीचे पंचनामे जलद व पारदर्शी होण्यासाठी ई-पंचनामा प्रणाली तसेच ई-फेरफार, संगणकीय सातबारा उतारे यासारख्या योजना राबऊन पारंपारिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली असणे, शेतकऱ्यांचा आर्थिक आधार बळकट करण्यासाठी "मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट)" प्रकल्प कार्यान्वित केला असणे, शेतमालाला बाजारपेठ मिळऊन देण्यासाठी शेतकरी ते खरेदीदार अशी मूल्य साखळी विकसित करण्यात आली असणे, "मागेल

त्याला शेततळे" या योजनेला शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद लाभल्याने त्यात फळबागा, ठिंबक सिंचन, शेडनेट, हरितगृहे, आधुनिक पेरणी यंत्रे, कॉटन श्रेडर यांचा समावेश करण्यात आला असणे, शेतक-यांसाठी महत्वाचे असणारे वैनगंगा पैनगंगा नदीजोड प्रकल्प, मराठवाडा वॉटर ग्रीड, POCRA टप्पा-२ तसेच, जलयुक्त शिवार टप्पा-२ यासारखे महत्वाकांक्षी प्रकल्प तातडीने मार्गी लावण्याचे प्रयोजन असणे, मविआकडून शेतक-यांना नैसर्गिक आपत्तीसाठी नुकसान भरपाई म्हणून केवळ ८,७०१ कोटी निधी वितरित करण्यात आला असताना विद्यमान शासनाच्या काळात हाच निधी १६,३०९ कोटी वितरित केला असणे, राज्यातील शेतकरी बांधवांना दिवसा वीज मिळावी याकरिता राज्यातील सर्व सब स्टेशनच्या परिसरात सोलर पार्क उभारण्याचे प्रयोजन असणे, याद्वारे निर्माण झालेल्या विजेचा वापर कृषी फिडर्सना पुरवठा करण्यासाठी अपेक्षित असणे, राज्यात जगातील सर्वात मोठा ९ हजार मेगावॅट क्षमता असलेला डिस्ट्रब्युटेड रिन्युएबल एनर्जी प्रकल्प उभारण्यात येत असणे, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मुळे ५० टक्के कृषी फिडर्स सौरऊर्जेवर चालविणे शक्य होणार असणे, विद्यमान शासनाने शेतक-यांना सिंचनासाठी "मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना" जाहिर केली असणे, या शासनाने "मागेल त्याला सौरकृषी पंप योजना" सुरु केली असल्याने शेतकऱ्यांना केवळ १० टक्के रक्कम भरुन सौर पॅनल्स व पंपासहित सर्व सिंचन सुविधा प्राप्त होणे, दलित आणि आदिवासी शेतकऱ्यांना तर ही रक्कम केवळ ५ टक्के भरावी लागणे, राज्यात शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाचे पांदण रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पांदण रस्ते योजना" शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने अधिक सुटसुटीत करुन राबविण्याची आवश्यकता, या शासनाच्या काळात २७ सिंचन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली असणे, परिणामी विशेषतः मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांना वर्षातून एकापेक्षा जास्त पिके घेणे शक्य झाले असणे, राज्यात जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण, गाळमुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे इ. योजना एकत्रितपणे राबविल्याने केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने जाहिर केलेल्या भारतातील जलाशयांच्या गणनेत महाराष्ट्राचा पहिला क्रमांक आला असल्याचे निदर्शनास येणे, हे अभियान देशातील अन्य राज्यांसाठी एक आदर्श व पथदर्शी झाले असणे, कर्जबाजारी शेतक-यांना आधार देऊन कर्जमुक्त करण्यासाठी "महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना" सुरु करण्यात आली असणे, कांद्याला योग्य भाव मिळावा याकरीता कांद्याचे दर ठरविण्याचे अधिकार केंद्राच्या ग्राहक संरक्षण मंत्रालयाने स्वतःकडे ठेवले असणे, तूर हे जिरायती शेतक-यांचे पिक असून ते नैसर्गिक आपत्तीत तग धरणारे, कमी खर्चाचे व आंतरपिक पध्दतीने घेता येणारे असल्याने त्याची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रोत्साहन देण्याची आवश्यकता, कापूस लागवड ते वेचनी यातील बहुतांश कामे मजुरांऐवजी यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून करणे आवश्यक असून हमी भावाने कापूस खरेदीसाठी सीसीआयने उघडलेल्या केंद्राची संख्या वाढविण्याची आवश्यकता, किंमत स्थिरीकरण योजनेंतर्गत नाफेडने २.२२ लाख मे.टन व एनसीसीएफ अंतर्गत ०.३५ लाख मे. टन कांदा खरेदी केला असणे, हमीभावाने कापूस खरेदीसाठी सी.सी.आयने राज्यात १२१ खरेदी केंद्रे मंजूर केली असणे, कापूस प्रक्रिया उद्योगातील सर्व घटकांना काही सवलती देण्याची आवश्यकता, कापूस, सूत, कापड निर्यातीच्या संधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, १२ व्या पंचवार्षिक योजनेत अन्नधान्याच्या गरजेसोबतच नगदी

पिकांचीही गरज भागविण्यासाठी कापूस पिकाचा समावेश करण्यात आला असणे, कापूस आधारित पिक पध्दतीस चालना देणे, कापूस पिकात एकात्मिक किड व्यवस्थापनास चालना देणे, अधिक लांब धाग्याच्या कापसांच्या वाणांची प्रात्यक्षिके आयोजित करून कापूस उत्पादकास चालना देण्याचे या शासनाचे धोरण असणे, कापसासाठी ५०० व सोयाबीन साठी २७० शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, धानाला २० हजार रुपये बोनस देण्याचा निर्णय या शासनाने घेतल्याने त्याचा ६ लाख शेतकऱ्यांना लाभ मिळणे, 'नारीशक्ती दुत ॲप' हे क्रांतिकारी ॲप्लीकेशन शासनाने सुरु केल्याने ते गरजू महिलांना ओळखण्यासाठी व सक्षम करण्यासाठी उपयुक्त ठरत असणे, राज्यातील युवकांना स्पर्धेच्या युगात शक्तीशाली स्पर्धक म्हणून उभे राहता यावे याकरिता युवा प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली असणे, युवकांना विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्याच्या दृष्टीने त्यांना वसतीगृहाची, निवासाची कुठेही अडचण येऊ नये या उद्देशाने राज्यातील ६ महसूल विभागात १०० युवक-युवतींसाठी युवा वसतीगृह उभारण्यास मान्यता देण्यात आली असणे, राज्यात पर्यटनाला चालना देण्यासाठी शाश्वत पर्यटन धोरण आखण्यात येत असणे, राज्यातील ५० नवीन पर्यटन स्थळांची निवड करून त्या ठिकाणी थीम पार्क, ॲडव्हेंचर स्पोर्ट, शॉपिग मॉल, वॉटर मॉल आणि निवास व्यवस्था करण्यात येत असणे, बुलढाणा येथील लोणार, अंजिठा-वेरुळ, कळसूबाई, त्र्यंबकेश्वर तसेच कोकणातील सागरी किल्ल्यांच्या ठिकाणी पर्यटकांसाठी उच्च दर्जाच्या सुविधा निर्माण करण्यात येत असणे, सातारा येथील शिवसागर जलाशय, भंडाऱ्यातील गोसीखुर्द जलाशय तसेच जळगाव येथील वाघूर जलाशय येथे नाविन्यपूर्ण जलपर्यटन प्रकल्प राबविण्यात येत असणे, कोकणातील पर्यटनास चालना देण्यासाठी शिवकालीन ३२ गडकिल्ल्यांचे नुतनीकरण व संवर्धन करण्याचे प्रस्तावित असणे, राज्यातील पर्यटकांना व भाविकांना योग्य दरामध्ये उत्तम व सुरक्षित सुविधा पुरविण्यासाठी श्रीनगर, जम्मू काश्मीर आणि अयोध्या येथे महाराष्ट्र भवन बांधण्याचा निर्णय घेतला असणे, राज्यात शेतकरी कर्जमुक्त व सधन होऊन शेतकरी, शेतमजुर, महिला व युवकांना बळकट करण्यासाठी, पर्यटनाला चालना मिळण्यासाठी व लोक कल्याणकारी आणि गतीमान राज्य निर्माण करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**आठ : (मंगळवार, दिनांक ११ मार्च, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, भास्कर जाधव, नाना पटोले, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. सुनिल प्रभू, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री रोहित पाटील, दिलीप सोपल, अमीन पटेल, रोहित पवार, अजय चौधरी, अमित देशमुख, उत्तमराव जानकर, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अस्लम शेख, संदिप क्षिरसागर, कैलास घाडगे-पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री बापूसाहेब पठारे, सुनिल राऊत, अमित झनक, नारायण पाटील, संजय पोतनीस, विकास ठाकरे, अभिजीत पाटील, नितीन देशमुख, शिरीषकुमार नाईक, राजू खरे, वरुण सरदेसाई, संजय मेश्राम, अनंत (बाळा) नर, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री हारुन खान, साजिद खान पठाण, महेश सावंत, हेमंत ओगले, मनोज जामसुतकर, रामदास मसराम, गजानन लवटे, अनिल मांगुळकर, सिध्दार्थ खरात,**

**संजय देरकर, बाबाजी काळे, प्रविण स्वामी, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"जुलै, २०२४ मध्ये राज्य सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लागू करणे, सदर योजनेमध्ये तब्बल २ कोटी ६३ लाख लाडक्या बहिणींची नोंदणी करणे व त्यांना रु. १५००/- दरमहा अनुदान देण्यास सुरुवात करणे, योजनेच्या निकषांचे उल्लंघन करुन गैरफायदा घेतलेल्या लाडक्या बहिणींच्या अर्जांची छाननी माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये सुरु करणे, अनेक बहिणींनी स्वतःहून अर्ज मागे घेणे व लाखों बहिणींचे अर्ज छाननीमध्ये बाद करण्यात येणे, प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) गणपतीच्या मूर्तीवर असलेली बंदी, सदर बंदीमुळे माघी गणेश जयंतीच्या मूर्तींच्या विसर्जनाची झालेली कोंडी, अद्यापही माघी गणपतींच्या मूर्तींचे विसर्जन न झाल्यामुळे भाद्रपद महिन्यातील गणेश मूर्तींच्या (पीओपी) विसर्जनाच्या आखलेल्या उपाययोजनांवर प्रश्न निर्माण होणे, पीओपी व्यतिरिक्त अन्य पर्याय उपलब्ध नसल्यामुळे गणेश भक्त व मूर्तीकार यांच्यामध्ये पसरलेले चिंतेचे वातावरण, मुंबई महानगर प्रदेशातील रस्ते वाहतूक, मेट्रो रेल्वे या सार्वजनिक वाहतूक सेवा अपुऱ्या असल्यामुळे 'केबल कार' वाहतूक सेवा सुरु करण्यासाठी आराखडा तयार करणे, राज्यातील धार्मिक स्थळांना जोडण्यासाठी शक्तीपीठ मार्ग शासनाने आखणे, सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता, राज्यातील शहरी तसेच ग्रामीण भागातील रस्त्यांची झालेली दुरावस्था, पावसाळ्यापूर्वी सदर रस्ते वाहतूकीसाठी योग्य करण्याची आवश्यकता, राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील अनेक तरुण बेरोजगार असणे, त्यांना रोजगार उपलब्ध करण्याची आवश्यकता, राज्यातील द्राक्ष बागायतदारांचे कमी भावामुळे झालेले नुकसान, महाशिवरात्री हा दिवस द्राक्ष दिन म्हणून साजरा करून राज्यातील शेतकऱ्यांना हातभार लावण्याची आवश्यकता, राज्यात राजरोसपणे डान्सबार मोठ्या प्रमाणावर सुरु असणे, पोलिसांचे डान्सबारवर बंदी आणण्यास जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, राज्यात मागेल त्याला सौर पंप योजनेतील जाचक अटींमुळे अनेक शेतकरी सदर योजनेपासून वंचित असणे, राज्यात विविध समाजांसाठी १८ महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात येणे, परंतु त्यांना निधी न दिल्यामुळे त्यांची कामे प्रत्यक्षात सुरु न होणे, सध्याचे सरकार शेतकऱ्यांच्या बाबत गंभीर नसल्याचे निदर्शनास आले असून निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीची घोषणा करुनही अद्याप कर्जमाफीबाबत कोणताही निर्णय घेतलेला नसणे, तसेच विदर्भातील धान, सोयाबीन, कापूस इत्यादी पिकांना बाजारभाव मिळत नसणे, इतर पिकांना हमीभाव मिळण्याची गरज असणे, तसेच राज्यातील अनेक रस्त्यांची विकासाच्या नावाखाली अत्यंत दुरावस्था झाली असल्याने या रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाणात वाढ झालेली असणे, रस्ते अपघातांमुळे मागील काही महिन्यांपासून अनेक बळी जाणे व अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे वाहनातून प्रवास करणाऱ्या वाहतुकदारांना जीव मुठीत ठेवून प्रवास करावा लागत असणे या सर्व बाबींमुळे राज्यातील शेतकरी, महिला वर्ग व सर्वसामान्य जनतेत असंतोष पसरला असून याबाबत राज्य शासनाने करावयाची उपाययोजना व करावयाची कार्यवाही."

रोटा/एचबी १००९-५ (२७००-०३-२०२५)

नऊ : **(मंगळवार, दिनांक ११ मार्च, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री अतुल भातखळकर, अर्जुन खोतकर, दिलीप वळसे-पाटील, संजय केळकर, दिपक केसरकर, प्रकाश सोळंके, राम कदम, विजय शिवतारे, दौलत दरोडा, रविंद्र चव्हाण, रमेश बोरनारे, अनिल पाटील, अमित साटम, मंगेश कुडाळकर, चेतन तुपे, योगेश सागर, प्रकाश सुर्वे, संग्राम जगताप, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री राजेंद्र गावित, दिलीप बनकर, ॲड. पराग अळवणी, डॉ.बालाजी किणीकर, श्रीमती सुलभा खोडके, कॅ. आर. तमील सेल्वन, सर्वश्री अशोक पाटील, राजकुमार बडोले, मिहिर कोटेचा, शांताराम मोरे, राजू कारेमोरे, पराग शाह, दिलीप लांडे, चंद्रकांत नवघरे, कालिदास कोळंबकर, महेंद्र थोरवे, संजय बनसोडे, श्रीमती विद्या ठाकूर, श्री. महेंद्र दळवी, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री प्रवीण दटके, तुकाराम काते, सुनिल शेळके, मोहन मते, निलेश राणे, किसन कथोरे, राजेश क्षिरसागर, डॉ.किरण लहामटे, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री मुरजी पटेल, आशुतोष काळे, संजय उपाध्याय, विश्वनाथ भोईर, शेखर निकम, सर्वश्रीमती सना मलिक, देवयानी फरांदे, सर्वश्री किरण सामंत, विलास तरे, मंगेश चव्हाण, राजेश मोरे, हिरामण खोसकर, कुमार आयलानी, राजेश विटेकर, राजेश पवार, विनोद अग्रवाल, रत्नाकर गुट्टे, शंकर जगताप, सिध्दार्थ शिरोळे, हेमंत रासने, भिमराव तापकीर, सुनिल कांबळे, रणधीर सावरकर, सुधीर मुनगंटीवार, समीर कुणावार, सुरेश भोळे, शिवाजी कर्डिले, देवराव भोंगळे, राजन नाईक, श्रीमती स्नेहा दुबे, सर्वश्री महेश लांडगे, नरेंद्र मेहता, श्रीमती सुलभा गायकवाड, श्री. प्रशांत ठाकूर, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री सत्यजित देशमुख, हरिश पिंपळे, प्रताप अडसड, डॉ.संजय कुटे, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री सुमित वानखेडे, अभिमन्यू पवार, श्रीमती सीमाताई हिरे, श्री. विक्रम पाचपुते, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"हे राज्य लोकांचे आहे आणि लोकांसाठी आहे" ही भावना मनामध्ये ठेऊन महायुतीचे शासन वेगाने कार्यरत असणे, मुंबई-पुणे व एमएमआरडीएसह राज्यातील अन्य छोट्या शहरांमध्ये स्टार्टअप्सची संख्या वाढत असल्याने इंडिया स्टार्टअप्सनी घोषित केलेल्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र हे स्टार्टअप्सचे देशातील पहिल्या क्रमाकांचे राज्य ठरले असणे, महायुती शासनाने महाराष्ट्रात अशक्य वाटणारा समृध्दी महामार्ग कार्यान्वित केला असणे, या महामार्गामुळे मुंबई-पुण्यात होणारी गुंतवणूक धुळे, गडचिरोली, नागपूर, अमरावती या भागात वाढत असल्याचे निदर्शनास येणे, नागपूर-गोवा शक्तीपीठ द्रुतगती मार्गाचे बांधकाम हाती घेण्याचा निर्णय घेतला असणे, या द्रुतगती मार्गामुळे, त्या मार्गावरील प्रमुख धार्मिक क्षेत्रे व तिर्थस्थळे जोडण्याचे प्रयोजन असून या प्रदेशातील आर्थिक विकासाला देखील चालना मिळू शकेल, राज्याच्या शहरी भागात पायाभुत सुविधांद्वारे शहरी जीवनमान सुधारण्यासाठी 'नगरोत्थान महाभियान' प्रभावीपणे राबविण्याचे प्रयोजन असणे, या योजनेंतर्गत पाणी पुरवठा, मल:निस्सारण व विकास यांचे सुरु असलेले प्रकल्प दोन वर्षात पूर्ण करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले असणे, मुंबई ही देशाची

आर्थिक राजधानी असल्याने या शहरामध्ये गृहनिर्माण व गतीमान परिवहन हे मुद्दे प्राधान्याने विचारात घेऊन स्मार्ट सिटीच्या माध्यमातून स्थानिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाचा प्रयत्न असणे, मेट्रो-२ ए आणि २ बी ची सेवा सुरु झाल्याने पश्चिम द्रुतगती मार्गावरील अंधेरी आणि दहिसर च्या मध्ये वाहतुक कोंडी कमी होऊन मुंबईकरांचा प्रवास सुखकर झाल्याचे दिसून येणे, ठाणे-बोरीवली भुयारी मार्गाची निर्मिती करण्याचे धोरण प्रस्तावित असणे, मुंबई-पुणे मिसिंग लिंक या ६७०० कोटी रुपयांच्या प्रकल्पाचे काम सुरु असणे, वर्सोवा-वांद्रे सागरी सेतूची निर्मिती, शिवडी ते न्हावाशेवा या मुंबई पोरबंदर प्रकल्पाची निर्मिती जलदगतीने सुरु असणे, मुंबईतील कुर्ला येथील नेहरूनगर, टिळकनगर या म्हाडा वसाहतीतील अनेक इमारतींचा पुर्नविकास होऊन १० ते १५ वर्षे उलटल्यानंतरही त्यांना भोगवटा प्रमाणपत्र मिळाली नसल्याचे निदर्शनास येणे, या गृहनिर्माण वसाहतींसाठी लागू केलेल्या अभय योजनेची मुदत वाढविण्याची आवश्यकता, कुर्ला येथील रेल्वे हद्दीतील संतोषी माता नगर, साबळे नगर व क्रांतीनगर येथे अनेक वर्षे राहणा-या झोपडीधारकांना रेल्वे प्रशासनामार्फत पर्यायी जागा उपलब्ध करण्याकरिता राज्य शासनाने प्रयत्न करण्याची आवश्यकता, नेहरूनगर येथील म्हाडाच्या वसाहतीत राहणा-या पोलीस कर्मचा-यांना माफक दरात निवासस्थाने उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, राज्यभरात ४०९ नागरी समुहांमध्ये 'प्रधानमंत्री आवास योजना' (शहरी)' राबविण्याचे प्रयोजन असणे, या योजनेंतर्गत २ लाखांपेक्षा अधिक घरे बांधण्यात आली असून, १ लाख ८५ हजारांपेक्षा अधिक घरांचे बांधकाम प्रगतीपथावर असणे, मेट्रो तसेच कोस्टल रोड प्रकल्प पूर्ण झाल्याने मुंबईकरांचे जीवनमान उंचावणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सीमांकन करून वेगळी विकास नियंत्रण नियमावली तातडीने तयार करण्याची आवश्यकता, कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरवस्था तातडीने दूर करण्याची आवश्यकता, पुण्यातील सहकारी गृहनिर्माण संस्था व वसाहतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन पुनर्विकास करण्याची आवश्यकता, पुणे शहरात विमानतळाकरिता जागा राखीव असून अन्य पायाभुत सुविधा तातडीने करण्याची आवश्यकता, पुण्यातील जुन्या ब्रिटीशकालीन वाड्यांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, जुन्या चाळींची व्याख्या बदलून हेरिटेज टिडीआर प्रत्यक्ष अंमलात आला असणे, एमएमआरडीए क्षेत्रात सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासासाठी मुंबई जिल्हा बँकेला नोडल एजन्सी म्हणून मान्यता देण्यात येणे, मुंबईतील जुन्या इमारतींच्या स्वयंपुनर्विकासाकरिता मुंबई जिल्हा बँकेकडून देण्यात येणा-या कर्ज मर्यादेत वाढ करण्यात आली असल्याने गृहनिर्माण प्रकल्प वेगाने उभे रहात असल्याचे निदर्शनास येणे, मानीव अभिहस्तांतरण करण्यासाठी स्टॅम्प ड्युटी भरण्यात सुलभता होण्यासाठी मुद्रांक शुल्क अभय योजना सुरु करण्यात येणे, झोपडपट्टी पुनर्वसन मधील सदनिका हस्तांतरण शुल्कात ५० टक्के कपात करण्याचा निर्णय घेण्यात येणे, राज्यात ५१ लाख घरे बांधण्याचे प्रस्तावित असणे, ठाणे शहरात एमआयडीसीच्या अभिन्यासातील १५०० हेक्टर भूखंडावर जगातील सर्वात मोठा क्लस्टर प्रकल्प राबविण्यात येणे, समुह विकास पध्दतीने हा प्रकल्प राबविण्याचे प्रयोजन असणे, वाशी येथील सध्याच्या दोन खाडी पुलांना समांतर अशा तिस-या सहा पदरी खाडी पुलाच्या प्रकल्पाचे काम सुरु असणे, नवी मुंबई विमानतळामुळे वाढणा-या लोकसंख्येसाठी नियोजित 'नैना' प्राधिकरणामार्फत २३ गावांच्या नियोजित आराखड्याच्या अंमलबजावणीस गती देण्याची आवश्यकता, मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती

संभाजीनगर यासारख्या मोठ्या शहरांचा मेगापॉलिस मेटाव्हर्स प्रकल्पाच्या मदतीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जागतिक पटलावरचे हे महानगर त्याच उच्च दर्जाचे व्हावे व येथील प्रत्येक कुटुंबात सुख आणि समाधान नांदावे ही या शासनाची महत्वाकांक्षा असणे, मुंबई व एमएमआरडीए क्षेत्रातील घरांची समस्या, वाहतूक समस्या इ. चे गतीमानतेने निर्मूलन करून मुंबईचा पर्यावरणपूरक विकास करण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ११ मार्च, २०२५

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा